शपथेवर उलट—तपास श्री केदार विधीज्ञ मार्फत गैरअर्जदारातर्फे :—

०७. मी बॅकेमधुन दि.३१.१२.२०२० रोजी सेवा निवृत्त झालो. हे म्हणणे खरे आहे की त्या संदर्भात बॅकेने मला दि.१२.०२.२०२० रोजी पत्र दिले होते. नि.क्र.यु—७ वरील पत्र हे तेच आहे. नि.क्र.यु—७ व्दारे मला दि.१७.०४.२०२० पासुन रजेवर जाण्यास सांगीतलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की मला बॅकेने दिलेल्या नि.क्र.यु—७ वरील पत्रामध्ये मला सेवा निवृत्ती पुर्वी शिल्लक असलेल्या रजा उपभोगण्याकरीता दि.१७.०४.२०२० पासुन रजेवर जाण्याकरीता कळविलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की बॅकेतील प्रत्येक कर्मचा—याला तो कामावर रूजु झाल्यापासुन ते सेवा निवृत्ती पर्यंत काम करावे लागते. हे म्हणणे खरे आहे की त्याचप्रमाणे मी बॅकेमध्ये मी रूजु झाल्यापासुन ते सेवा निवृत्ती पर्यंत काम केले आहे.

मध्यान्हाची वेळ झाल्यामुळे उलट—तपास तहकुब करण्यात येते.

माझे समक्ष

स्वाक्षरी/—

(श्रीमती रू.वि. मेटे)

चंद्रपुर. न्यायाधीश

दि.२७.०३.२०२३. कामगार न्यायालय, चंद्रपुर

मध्यानंतर शपथेवर उर्वरित उलट—तपास श्री केदार विधीज्ञ मार्फत गैरअर्जदारातर्फे :—

०८. हे म्हणणे खरे आहे की बॅकेने मला दि.२७.०४.२००४ च्या पत्रानुसार मला सेवा निवत्तीच्या तारेखपर्यंत काम करता येईल व माझया सेवे बाबतचे सर्व अधिकार बॅकेच्या अध्यक्षांना राहतील असे नमुद केले होते. हे म्हणणे खरे नाही की संचालक मंडळाने दि.३१.१२.२०२० रोजी ठराव घेवुन माझया ९० दिवासाच्या रजेचा पगार देण्यात येणार नाही असे ठरविले होते. हे म्हणणे खरे आहे की मी ज्या बॅकेत काम करीत होतो त्या बॅकेच्या संचालक मंडळाचा ठराव लागु

होतात व त्याप्रमाणे कामकाज चालते. संचालक मंडळाच्या घेतलेल्या ठरावाबाबत बॅकेच्या कर्मचा—यांना माहीत नाही.

<u>प्रश्न</u> :— या प्रकरणामध्ये तुम्ही संचालक मंडळाने घेतलेला ठराव नियमबाहय आहे अशी कोणतीही मागणी केलेली नाही.

<u>उत्तर</u> :— संचालक मंडळ जे ठरव घेतात ते कर्मचा—यां पर्यंत माहीती होत नाही.

जेव्हा सेवा निवृत्त झालो, त्यावेळेस विभागीय अधिकारी होतो.

<u>प्रश्न</u> :— संचालक मंडळ जे ठराव घेतात त्याची प्रत बॅंक मॅनेजर व ईतर विभागांना दिल्या जाते.

<u>उत्तर</u> :— प्रत्येकच ठरावाची प्रत दिले जाते असे नाही.

०९. हे म्हणणे खरे आहे की बॅकेच्या संचालक मंडळाला तुम्हाला रजेचा ९० दिवसावा पगार दयायचा किंवा नाही हे ठरविण्याचा अघिकार आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी केस दाखल केली असुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

<u>फेर तपास</u> : <u>काही नाही</u>

माझे समक्ष

स्वाक्षरी/—

(श्रीमती रू.वि. मेटे)

चंद्रपुर. न्यायाधीश

दि.२७.०३.२०२३. कामगार न्यायालय, चंद्रपुर